**मूलमंत्र • आयआयएम नागपूरमध्ये लाइफ कोच व प्रेरक वक्ता गौरांग दास यांचे प्रतिपादन**

# युवकांनी स्वत:ची ऊर्जा ओळखावी

नागपूर. आजच्या लोकांना वाटते की, धन, यश, आरोग्य किंवा संपत्तीची सर्वांत मोठी हानी होत आहे, परंतु भगवद् गीतेनुसार आशा-अपेक्षाचा नाश होणे हे सर्वांत मोठी हानी आहे. आजची युवापिढी झपाट्याने अपेक्षाहीन होत आहे. हे आई-वडील, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांकरिता चिंतेचा विषय आहे. आजची परिस्थिती लक्षात घेता सनातन शिक्षण आणि आधुनिक शिक्षणाचे समन्वय अत्यंत आवश्यक आहे. दोन्हीच्या समन्वयाने परिस्थितीत परिवर्तन करता येऊ शकते. आध्यत्मिक शिक्षणातून व्यक्तीत मोठा बदल घडवून आणता येऊ शकतो.

युवकांनी स्वत:ची ऊर्जा ओळखणे आवश्क आहे, असे मत लाईफ कोच व प्रेरक वक्ता गौरांग दास यांनी व्यक्त केले. ते आयआयएममध्ये आयोजित कार्यक्रमाला संबोधित करीत होते. यावेळी आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मेत्री प्रामुख्याने उपस्थित होते.

## धर्म व्यक्तीला मानसिकदृष्ट्या सक्षम बनविते



त्यांनी पुढे सांगितले की, आज आपण थर्मल, पेट्रोलियमसह विविध बाहेरील ऊर्जेची चर्चा करीत असतो, परंतु व्यक्तीच्या आत सर्वांत मोठी ऊर्जा दडली आहे. आज मंदिर, मशीद, चर्चसह विविध आध्यात्मिक संस्था आहेत, ज्या व्यक्तीला ऊर्जा प्रदान करण्यात मदत करीत आहे. आज या संस्था एखाद्या हेल्थ केयरप्रमाणे काम करीत आहे. जर आपण लोकांना आंतरिक रूपाने शांत करण्यात यशस्वी झालो तर पर्यावरण आणि समाजात शांतता आणू शकतो. यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहे. मंदिर मनाच्या शांततेसाठी हॉस्पिटलप्रमाणे कार्य करीत आहे. लोकांनी हे सर्व व्यावहारिक जीवनात स्वीकारायला हवे. प्रत्येक धर्म व्यक्तीला मानसिक रूपाने सक्षम बनविण्यात समर्थ आहे. परंतु याकडे लक्ष दिल्या जात नाही. धर्मांचे प्रतिनिधित्व केल्या जात नाही. व्यक्तीवर भर दिल्यास निश्चतच परिवर्तन घडू शकते.

## नवे शिक्षण धोरण हिताचे

त्यांनी सांगितले की, नवीन शिक्षण धोरण सर्वांच्याच हिताचे आहे. यामुळे चांगले परिवर्तन येईल. यात अनेक असे वैशिष्ट आहे, जे युवकांना स्वतंत्र रूपाने उद्योजक बनविण्यात यशस्वी होईल. आध्यात्मिक शिक्षणावरही यात भर दिला आहे. हे धोरण युवकांना प्रगतिपथावर नेणारे सिद्ध होईल.

## आध्यात्मिक शिक्षणावर भर

आयआयएम नागपूरमध्ये आध्यत्मिक शिक्षणावर अधिक भर दिला जात आहे. आधुनिक शिक्षणासह आध्यत्मिक शिक्षणही अत्यंत आवश्यक झाले आहे, त्यामुळेच संस्था यावर पूर्णत: भर देत आहे. शिक्षणाबाबत अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. आजच्या तुलनेत पाहिल्यास सन 1850 मध्ये जवळपास 7 लाख संस्कृतचे गुरुकुल होते. ज्यात हळू-हळू कपात होत गेली.